## नियमित दिवाणी मुकदमा क्र. २४ सन २०१९ निशाणी ६४ खालील आदेश

नामदेव सखाराम तवटे
वि.
चंद्रकांत राजाराम वायंगणकर व.१४

प्रतिवादी क्र. ६ प्रविण वासुदेव नारकर यांनी त्यांचे विरुध्द झालेला "कैफियत नाही" चा आदेश रदद करुन त्याची कैफियत दाखल करुन घेणेस परवानगी मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांनी असे कथन केले की, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. ६ यांनी आपली मुदतीत कैफियत दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द न्यायालयाने "कैफियत नाही" असा आदेश केलेला आहे. सदरहु दाव्याचे कामी कैफियत देण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रे जमविण्यात प्रतिवादी यांचा बराचसा वेळ गेल्याने त्यांना या दाव्याचे कामी आपली कैफियत मुदतीत दाखल करत आली नव्हती. प्रतिवादी क्र. ६ हे प्रस्तुत दाव्याचे कामी या अर्जासोबत आपली पुरसीस देऊन आपली कैफियत देत आहेत. प्रतिवादी क्र. ६ यांना या दाव्याचे कामी त्यांची कैफियत देण्याची संधी न मिळाल्यास त्यांना मिळणा–या न्यायास मुकावे लागणारे आहे. परिणामी प्रतिवादी यांना न्यायाची अनेक प्रकरणे दाखल करावी लागून त्यांना शारिरीक व मानसिक त्रासास सामोरे जावे लागून त्यांचे कधीही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणारे आहे. तरी प्रतिवादी क्र. ६ विरुध्द न्यायालयाने केलेला "कैफियत नाही"चा आदेश एकवेळ रद्द करावा व आपली कैफियत देण्यास संधी देणेबाबत योग्य ते आदेश होऊन कैफियत स्विकारण्याबाबत आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे. तसेच त्यांनी प्रस्तुत अर्जासोबत स्वतंत्र कैफियत न देता त्यांनी सदर अर्जासोबत दाखल केलेली पुरसीस देऊन दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १, ३ ते ५, ७ ते ११ यांनी नि. ५ कडील अर्जावर दाखल केलेले निशाण २७ येथील म्हणणे हेच प्रतिवादी क्र. ६ तर्फे वादीच्या दाव्यावर कैफियत आहे व तीच दाव्यचे कामी वाचणेत यावी अशी पुरसीस दिलेली आहे.

०३. वादीने अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. अर्ज मंजुर करायचा असेल तर खर्चासह मंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांना दावा समन्सची बजावणी होवून हजर झाले. परंतू, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ अन्वये प्रतिवादी क्र. ६ यांस उचित संधी देवून देखील त्यांनी विहीत मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादी क्र.६ यांना कैफियतीसाठी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे जमविण्यात प्रतिवादी यांचा बराचसा वेळ गेल्याने त्यांना या दाव्याचे कामी आपली कैफियत मुदतीत दाखल करता आलेली नाही असे कारण प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केले आहे. सदर कथनाच्या पुष्ठयर्थ त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी हजर केला नाही. सबब, त्यांनी दिलेले कारण हे संयुक्तीक नाही. तरीही नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी यांना दाव्यामध्ये आपली लेखी कैफियत दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे योग्य होईल. कारण वादीने प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापनेसाठी व प्रतिवादींविरुध्द कायम ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी हे आवश्यक पक्षकार असून न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीस आपली कैफियत मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे प्रतिवादीची कैफीयत अभिलेखावर घेतल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्याने वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही या निर्णयाप्रत मी आलो आहे.

०६. असे असले तरी प्रतिवादी यांनी त्यांची प्रस्तुतची कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबामुळे न्यायालयाचा त्याच बरोबर वादीचा बहुमूल्य वेळ वाया गेलेला आहे. अशा परिस्थितीत, प्रस्तुत प्रतिवादी यांच्यावर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. खर्चाची रक्कम दिल्यानंतर त्यांनी सदर अर्जासोबत दाखल केलेली पुरसीस दाव्याचे कामी वाचण्यात येईल व सदर पुरसीसप्रमाणे निशाण २७ येथील म्हणणे हे प्रतिवादी क्र. ६ यांची कैफियत म्हणुन वाचण्यात येईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.३००/–(रक्कम रुपये तीनशे मात्र) इतका

खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी एकूण खर्च रक्कम रु.३००/– वादी यास अदा करावी, त्यानंतर त्यांनी सदर अर्जासोबत दाखल केलेल्या पुरसीस प्रमाणे निशाण क्र. २७ येथील दाखल म्हणणे स्विकारुन ते दाव्याचे कामी वाचणेत येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.12.17 19:07:39 +0530

कुडाळ. (पी. आर. ढोरे)
दिनांक : १७/१२/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.